पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ४४

<u>सभावृत्तांत</u>

दिनांक - ५.२.२०१३ वेळ- दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ५/२/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगदीश शेट्टी - सभापती
२) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
३) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
४) मा.छाया जगन्नाथ साबळे
५) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
६) मा.पाडाळे निता विलास
७) मा.जावेद रमजान शेख
८) मा.जगताप नवनाथ दत्तू
९) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१०) मा.भोसले राहुल हनुमंतराव
११) मा.चोंधे आरती सुरेश
१२) मा.भालेकर अरुणा दिलीप
१३) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
१४) मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

याशिवाय मा.प्रकाश कदम–अति.आयुक्त, मा.सावंत-सह आयुक्त, मा.पवार, मा.मुंढे, मा.गावडे, मा.दुरगुडे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.झुरे, मा.फुंदे- सहा. आयुक्त, मा.घाडगे - मुख्यलेखापरिक्षक, मा.चाकणकर-प्र.नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहरअभियंता,मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.तुपे- सह शहर अभियंता, मा.भोसले- मुख्यलेखापाल, मा.पवन साळवे – अति.वैद्य.अधिकारी मा.दुधेकर, मा.ढगे, मा.निकम, मा.इंगळे, मा.शरद जाधव, मा.रामदास जाधव, मा.कुदळे, मा.थोरात, मा.कपिले, मा.पठाण, मा.लडकत, मा.खाबडे, मा.शिर्के, मा.पिरजादे, शिक्षण मंडळ, मा.कांबळे- प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मा.शिंपी- नगररचनाकार,मा.किरण गायकवाड- जनसंपर्क अधिकारी, मा.पाटील – प्राचार्य आयटीआय मोरवाडी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

मा.सुषमा तनपुरे - मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक २७०८ दिनांक २९/१/२०१३ मध्ये माहे मार्च २०१३ मध्ये या मजकुरानंतर " महापौर चषक जिल्हास्तर जलतरण स्पर्धा २०१३" हा मजकुर समाविष्ट करणेची दुरुस्ती करणेत यावी.

अ) मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक २७०८ दिनांक २९/१/२०१३ मध्ये माहे मार्च २०१३ मध्ये या मजकुरानंतर " महापौर चषक जिल्हास्तर जलतरण स्पर्धा २०१३" हा मजकुर समाविष्ट करणेची दुरुस्ती करणेत येवून त्या दुरुस्तीसह दिनांक २२/१/२०१३ व २९/१/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक-४२) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले

ब) दिनांक २९/१/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक-४३) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-

विषय क्रमांक :- ३०) येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे यांचेकडून अभिलेखाचे रेकॉर्ड बांधण्याचे कापडी रुमाल खरेदीबाबत.

विषय क्रमांक :- ३१) लेखाशिर्षात वाढ/घट करणेस मंजूरी देण्याबाबत मा.चंद्रकांत वाळके, मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक :- ३२) K2H Fellowship Program करिता उपस्थित राहणेकरिता प्रवास खर्च अदा करणेबाबत. मा.चंद्रकांत वाळके, मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक :- ३३) नाना नानी पार्क भोसरी उद्यानाचे देखभाल व दुरुस्ती कामास मुदतवाढ मिळणेबाबत. मा.चंद्रकांत वाळके, मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक :- ३४) मा.स्थायी समिती ठरावात दुरुस्ती करणेबाबत मा.चंद्रकांत वाळके, मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक :- ३५) मे.शिव अडव्हरटायझिंग या संस्थेस मनपा नियमानुसार करारनामा करणेबाबत. मा.सुषमा तनपुरे, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक :- ३६) प्रभाग क्र. ४२ चिंचवड मधील ख्रिश्चन व मुस्लिम दफनभूमी भैरवनाथ स्वयंरोजबागार सह संस्था यांना देखभाल संरक्षणाकामी देणेबाबत. मा.छाया साबळे, मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक :- ३७) पिं.चिं.म.न.पाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर सृष्टी डिझायनर आर्किटेक्ट गिरीश चिददरवार यांची नियुक्ती करणेबाबत. मा.सुषमा तनपुरे, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक :- ३८) म.न.पा.चे विद्युत विभागाचे वापराकरिता दहा नग हायड्रोलिक लॅडर (प्लॅफॉर्म) भाडेतत्वावर घेणेबाबत.

विषय क्रमांक :- ३९) विधवा, घटस्फोटीत व निराधार महिलांना कोटेशन अट शिथील करणेबाबत. मा.चंद्रकांता सोनकांबळे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक :- ४०) स्मशानभूमींसाठी केअरटेकर नेमणेबाबत. मा.राहुल भोसले, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक – २८०३ विषय क्रमांक – १
दिनांक – ५/२/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/१६/२०१३ दि.१०/१/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१९/२०१२-१३ मधील अ.क्र.७ अन्वये, वॉर्ड क्र.१० मोशी लक्ष्मीनगर व इतर ठिकाणचे नाल्याचे बांधकाम करणेकामी मे.धनेश्वर कन्स्ट्रक्शन (नि.र.रू. ८४,०३,०४७/- [र.रू.चौ-याऐंशी लाख तीन हजार सत्तेचाळीस] पेक्षा ३३.३० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. ५८,८५,०७४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८०४ विषय क्रमांक – २
दिनांक – ५/२/२०१३ विभाग – करआकारणी व करसंकलन
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.अश्विनी चिंचवडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कर/मुख्य/६/कावि/९०३/२०१२ दि.१४/१२/२०१२.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

सन २०१३-२०१४ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबीची फी / शुल्क सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे निश्चित करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षातील महापालिका करांचे दर व करेत्तर बाबींचे फी/शुल्क सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाकरिता निश्चित करणेत येऊन कायम ठेवणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८०५ विषय क्रमांक – ३
दिनांक – ५/२/२०१३ विभाग – बी.ओ.टी.विभाग
सुचक – मा.राहुल भोसले अनुमोदक – मा.आरती चौंधे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.बी.ओ.टी./कावि/९२/२०१२ दि.२६/१२/२०१२
विषय – बीओटी प्रकल्प या लेखाशिर्षावर तरतूद वर्गीकरणाबाबत.

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८०६ विषय क्रमांक – ४

दिनांक – ५/२/२०१३ विभाग – जकात

सुचक – मा.नवनाथ जगताप अनुमोदक–मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जकात/१०/कावि/३२८/२०१२ दि.२९/१२/२०१२.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये पुढील आर्थिक वर्षाकरिता लागू करावयाचे करांचे दर फेब्रुवारी महिन्याचे २० तारखेला किंवा त्यापुर्वी महापालिकेने निश्चित करावयाचे असल्याने प्रचलित दरपत्रकातील सर्व मालाचे सन २०१२-१३ मध्ये असलेले जकात दर सन २०१३-२०१४ करिता कायम ठेवणेस व दर समानीकरणाच्या प्रस्तावातील शासनाकडून जे दर मान्य होऊन येतील त्या शासन आदेशा प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८०७ विषय क्रमांक – ५

दिनांक – ५/२/२०१३ विभाग – क प्रभाग,

सुचक – मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक – मा.आरती चौंधे

संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/लेखा/नि.क./१५/कावि/३२३/२०१२दि.३/१०/२०१२.

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१२-१३ मधील अ.क्र.७८ अन्वये, वॉर्ड क्र.११ येथील विविध ठिकाणच्या मनपा इमारतीचे किरकोळ दुरुस्ती व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.जी.के.कांबळे (नि.र.रू.९,३२,९७३/- [र.रू.नऊ लाख बत्तीस हजार नऊशे त्र्याहत्तर] पेक्षा ३१.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८०८ विषय क्रमांक – ६

दिनांक – ५/२/२०१३ विभाग – प्रशासन

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.जावेद शेख

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/११६/२०१३ दि.०२/२/२०१३.

ॲड.सदानंद वाय देशमुख यांना महापालिकेमध्ये दिनांक ०९/०२/२०१३ पासून पुढे ०६ महिने कालावधीसाठी कायदा सल्लागार या पदावर मुदतवाढ देण्यासाठीचा संदर्भिय प्रस्ताव मा.आयुक्त यांनी क्रमांक प्रशा/१/कावि/५९/२०१३, दिनांक १७/०१/२०१३ अन्वये माघारी घेणेस परवानगी मागितलेने त्यास परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८०९ विषय क्रमांक – ७

दिनांक – ५/२/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/२२/२०१३ दि.१९/१/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-१३ मधील अ.क्र.२४ अन्वये, वॉर्ड क्र.१० मोशी पुणे-आळंदी ते दत्तनगर (काळीभिंत) रस्त्याचे डांबरीकरण करणेकामी मे.जितेंद्रसिंग (नि.र.रू.७४,६८,८६९ /- [र.रू.चौ-याहत्तर लाख अडुसष्ट हजार आठशे एकोणसत्तर] पेक्षा ११.१७ **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.६९,६६,३२६/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८१० विषय क्रमांक – ८

दिनांक – ५/२/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक–मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/२२/२०१३ दि.१९/१/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-१३ मधील अ.क्र.१३ अन्वये, वॉर्ड क्र.१० मोशी विविध ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणेकामी मे.जितेंद्रसिंग (नि.र.रू.१,३०,७१,४३०/- [र.रू. एक कोटी तीस लाख एक्काहत्तर हजार चारशे तीस] पेक्षा ११.१७ **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१,२१,९१,९१९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८११ विषय क्रमांक – ९

दिनांक – ५/२/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/७/कावि/४२/२०१३ दि.२१/१/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाचे आरोग्य विभागासाठी साफसफाई साहित्य खरेदीकामी ई.नि.सु.क्र. ३०/२०१२-१३ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.रेखा इंजि. वर्क्स यांचे बाब क्र.१, २, ४, ५, ६, ७, ८, १२, १३, १४, १५, १६, २०, २१, २२, २४, २५, २८, ३०, ३४, ३७, ३९, ४२, ४४, ४५, ४७ व ४८ या साहित्याचे

दर एकूण र.रू.२०,४८,१९२/-, मे.कापसे एंटरप्रायजेस पिंपरी यांचे बाब क्र.३, ९, १०, ११, १७, १८, १९, २६, २७, ३१, ३२, ३३, ३८, ४३ व ४६ या साहित्यांचे दर एकूण र.रू. ८,१९,१८०/- व मे.पी.शेषाद्री अँन्ड कंपनी पिंपरी यांचे बाब क्र.१९, २३, २९, ३५, ३६, ४० व ४१ या साहित्याचे दर एकूण र.रू. ७७,११५/- स्विकृत करून व करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती त्याचे अवलोकन करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८१२ विषय क्रमांक – १०
दिनांक – ५/२/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:-मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.पापु/६/कावि/११३/२०१३ दि.२१/१/२०१३.

मा. सह शहर अभियंता क्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.३/७९/२०१२-१३ मधील अ.क्र.४८ अन्वये, अ प्रभागातील त्रिवेणीनगर, कृष्णानगर, पाण्याच्या टाक्यांवरून पाणीपुरवठा व्यवस्थापन करणेकरिता मजुर पुरविणेकामी मे.शुभम उद्योग (नि.र.रू.१८,५०,२२६/- [र.रू.अठरा लाख पन्नास हजार दोनशे सव्वीस] पेक्षा ३.५० % जास्त) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८१३ विषय क्रमांक – ११
दिनांक – ५/२/२०१३ विभाग– आकाशचिन्ह व परवाना
सुचक – मा.जावेद शेख अनुमोदक – मा.राहुल भोसले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आप/८/कावि/१८/२०१३ दि.२२/१/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन-

सध्या अस्तित्वात असलेल्या उद्योगधंदा परवाना फीचे दरपत्रक प्रपत्र अ, व्यवसाय परवाना फीचे दरपत्रक प्रपत्र ब व साठा परवाना फीचे दरपत्रक प्रपत्र क मध्ये प्रस्तावा सोबत सादर केलेले असून सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता वाढ करणेचे मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सध्या अस्तित्वात असलेल्या दरात सध्याची मंदीची परिस्थिती विचारात घेता सन २०१३-१४ करीता प्रस्तावीत केलेली २० % ऐवजी १० % वाढ करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव महापालिका सभेकडे पाठवावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८१४ विषय क्रमांक – १२
दिनांक – ५/२/२०१३ विभाग– आकाशचिन्ह व परवाना
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक–मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आप/९/कावि/९४/२०१३ दि.२२/१/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता अ, ब आणि क नुसार परिशिष्ठ अ मधील जाहीरात कराची व परिशिष्ठ ब मधील परवाना फी / शुल्क यामध्ये (विलंब शुल्क वगळता) तसेच परिशिष्ठ

क मधील जागाभाडे दर नमुद केलेले असून सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह जाहीरात कर, परवाना फी / शुल्क व जागा भाडे प्रस्तावा सोबतचे परिशिष्ठ अ, ब आणि क प्रस्तावित दरपत्रकाप्रमाणे वसुली करणेस मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांचेकडून करणेत आली असली तरी सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षासाठी परवाना फी व जागाभाडे यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ न करता फक्त जाहिरात करामध्ये १० % वाढ करणेस मान्यता देणेकामी तसेच याप्रमाणे सन २०१३-२०१४ या वर्षासाठी निश्चित करणेत आलेले जाहिरात कर, परवाना फी तसेच जागाभाडे यांचे दर २०१४-२०१५ या वर्षासाठीही कोणताही बदल न करता निश्चित करणेस मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव महापालिका सभेकडे पाठवावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८१५ विषय क्रमांक – १३

दिनांक – ५/२/२०१३ विभाग – जलनिसारण

सुचक – मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक – मा.आरती चौंधे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/२/कावि/८७/२०१३ दि.२२/१/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र.५/१८/१२-१३ मधील अ.क्र.३ अन्वये, ब प्रभागातील ड्रेनेज लाईन व चेंबर्सची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.छोटेलाल चौहान (नि.र.रू.७५,८६,८०९/- [र.रू.पंच्याहत्तर लाख शहाऐंशी हजार आठशे नऊ] पेक्षा ३९.५० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८१६ विषय क्रमांक – १४

दिनांक – ५/२/२०१३ विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.राहुल भोसले अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ:-मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/च-होली/००५/१३दि.२२/१/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या नवीन हद्दवाढीच्या भागशः मंजुर विकास योजनेतील अ)मा.महापालिका ठ.क्र.८५ दिनांक १/९/२०१२ ब)मा.महापालिका सभा ठ.क्र.१५२ दिनांक २६/११/२०१२ नुसार प्रभाग क्रमांक ७ मधील- प्रस्तावात नमुद केलेले उर्वरीत रस्त्यांचे व आरक्षणांचे प्रस्तावाने बाधीत खाजगी मिळकतींचे मुं.प्रां. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम १२६ मधील तरतुदीस तसेच भुसंपादन कायदा १८९४ प्रमाणे संपादन करणेस व येणा-या खर्चास (भूसंपादन अधिकारी कळवतील ती रक्कम) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८१७ विषय क्रमांक – १५

दिनांक – ५/२/२०१३ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.राहुल भोसले अनुमोदक – मा.आरती चौंधे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/मुका/तां/३५/२०१३दिनांक- २३/१/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या प्रशासकीय इमारतीमधील उव्दाहक क्र.१ ते ४ ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेचे सन २०१३-१४ साठी वार्षिक देखभाल दुरुस्तीचे काम उत्पादीत कंपनी मे.ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लिमिटेड यांचेकडून निविदा न मागविता थेट पध्दतीने परंतू रितसर करारनामा करून करून घेणेस व त्यापोटी येणारा खर्च र.रू. १,४७,५५२/- प्राप्त झालेल्या कोटेसननुसार मे.ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लिमिटेड यांस आगाऊ अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८१८ विषय क्रमांक – १६

दिनांक – ५/२/२०१३ विभाग–मुख्य कार्यालय विद्युत

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.सुभद्रा ठोंबरे

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.मुका/वि/जा/४२/२०१३ दि.२८/१/२०१३.

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या मुख्य प्रशासकीय इमारती मधील उव्दाहकाच्या वार्षिक निरिक्षणासाठी मा.विद्युत निरिक्षक (उव्दाहक), मुंबई यांना निरिक्षण फी र.रू.४,२००/- तातडीची बाब म्हणून श्री.कातोरे प्रकाश बाबुराव कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांनी रोखीने अदा केली असलेने सदरची रक्कम श्री.कातोरे यांना परतावा करणेस (सन २०१२-१३) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८१९ विषय क्रमांक – १७

दिनांक – ५/२/२०१३ विभाग–विद्युत मुख्य कार्यालय

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/९५/२०१३ दिनांक- २८/१/२०१३.

विषय – निविदा नोटीस क्र.३/७-१२/१३ मधील कामाचा करारनामा करणेस मंजूरीबाबत.

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८२० विषय क्रमांक – १८

दिनांक – ५/२/२०१३ विभाग –स्थापत्य

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.जावेद शेख

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/उद्यान/कावि/३८/२०१३ दि.२८/१/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१५/२०१२-१३ मधील अ.क्र.१ अन्वये, भोसरी आरक्षण क्र.४१४ येथे उद्यान विकसीत करणेकामी मे.शितल कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४६,०५,९६२/- [र.रू.शेहेचाळीस लाख पाच हजार नऊशे बासष्ट] पेक्षा १४.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.४१,११,३०५/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली

वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८२१ विषय क्रमांक – १९

दिनांक – ५/२/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.नवनाथ जगताप अनुमोदक – मा.राहुल भोसले

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/२९/२०१३ दि.२९/१/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१९/२०१२-१३ मधील अ.क्र.३ अन्वये, वॉर्ड क्र.१० मोशी येथील विकास (पुणे-नाशिक रस्ता ते मोशी आळंदी रस्ता) आराखड्यातील रस्ते तयार करणेकामी मे.श्री गणेश कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२,७९,३३,०१४/- [र.रू.दोन कोटी एकोणऐंशी लाख तेहतीस हजार चौदा] पेक्षा ३०.९० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२,०२,६६,७९८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८२२ विषय क्रमांक – २०

दिनांक – ५/२/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.आरती चौंधे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/२८/२०१३ दि.२९/१/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१९/२०१२-१३ मधील अ.क्र.९ अन्वये, डुडूळगांव येथील विकास आराखड्यातील रस्ते खडीकरणे करणे (जुने गट नं.१९२ ते २४०) कामी मे.श्री गणेश कन्स्ट्रक्शन (नि.र.रू. ६५,०१,३५९/- [र.रू.पासष्ट लाख एक हजार तीनशे एकोणसाठ] पेक्षा ३४.५०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.४४,७१,३१०/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार निविदेतील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८२३ विषय क्रमांक – २१

दिनांक – ५/२/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/२७/२०१३ दि.२९/१/२०१३

विषय – नि.नो.क्र.१९/२०१२-१३ वॉर्ड क्र.२१ मधील रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत.

विषय क्रमांक २१ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – २८२४ विषय क्रमांक – २२
दिनांक – ५/२/२०१३ विभाग– नागरवस्ती विकास योजना
सुचक – मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.अतिरीक्त आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/२/कावि/५३/२०१३ दि.२९/१/२०१३.

मा. अतिरीक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपा मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत घटक योजना क्र.५ नुसार सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात इयत्ता १२ वी नंतरचे वैद्यकीय, अभियांत्रिकी, संगणक प्रथम वर्ष पदवी परीक्षा या सारखे उच्च शिक्षण घेणा-या मागासवर्गीय युवक/युवतींना अर्थसहाय्य देणेकामी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात या कार्यालयात एकुण २४४ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ८३ अर्ज पात्र झाले असून १६१ अर्ज अपात्र झाले आहेत. सदर पात्र अर्जदारांना प्रत्येकी र.रू.१०,०००/- प्रमाणे अर्थसहाय्य देण्याकरिता एकूण र.रू.८,३०,०००/- (र.रू.आठ लाख तीस हजार) अदा करणेस आवश्यक असून सदरचे खर्चास तसेच अपात्र अर्जदारांपैकी कागदपत्रांची त्रुटी पुर्तता केल्यानंतर पात्र ठरणा-या अर्जदारास प्रत्येकी र.रू.१०,०००/- अर्थसहाय्य अदा अदा करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८२५ विषय क्रमांक – २३
दिनांक – ५/२/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.जावेद शेख अनुमोदक–मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.पापु/६/कावि/१३९/२०१३ दि.२८/१/२०१३.

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.३/७९/२०१२-१३ मधील अ.क्र.७५ अन्वये, जलक्षेत्र क्र.अ/६ मधील मोहननगर, रामनगर, विद्यानगर इ.भागात आवश्यक ठिकाणी पाईपलाईन टाकणेकामी मे.अक्षय कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२२,४१,०९८/- [र.रू.बावीस लाख एक्केचाळीस हजार अठ्ठ्यान्नव] पेक्षा १७.६६ **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८२६ विषय क्रमांक – २४
दिनांक – ५/२/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.राहुल भोसले अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/नि/कावि/११२/२०१३ दि.२१/१/२०१३.
विषय – नि.नो.क्र.६/२८/२०१२-१३ मधील कामाचे करारनामे करणेस मंजूरी मिळणेबाबत.

विषय क्रमांक २४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८२७ विषय क्रमांक – २५
दिनांक – ५/२/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.पापु/६/कावि/१४०/२०१३ दि.२८/१/२०१३.

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.३/७९/२०१२-१३ मधील अ.क्र.७६ अन्वये, जलक्षेत्र क्र.बी/९, १०, ११ मध्ये टाकीवरील वितरण व्यवस्थेसाठी मजुर पुरविणेकामी मे.भारतीय महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था (नि.र.रू.१८,०७,५१२/- [र.रू.अठरा लाख सात हजार पाचशे बारा] पेक्षा ९.०० % जास्त) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८२८ विषय क्रमांक – २६
दिनांक – ५/२/२०१३ विभाग – जल:निसारण
सुचक – मा.जावेद शेख अनुमोदक–मा.नवनाथ जगताप

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. जनि/२/कावि/१२०/२०१३ दि.२९/१/२०१३.

विषय – नि.नो.क्र.५/१८/२०१२-१३ मधील अ.क्र.१२ वरील कामाचा करारनामा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

विषय क्रमांक २६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८२९ विषय क्रमांक – २७
दिनांक – ५/२/२०१३ विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/१/कावि/२०२/२०१३ दि.२९/१/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

श्री.गव्हाणे नारायण तुकाराम, ग्राऊंडमन यांना र.रू.५,०००/- याप्रमाणे दि.१/२/२०१३ पासून पुढील सहा महिने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर मुदतवाढ देणेस व त्यांच्या मानधनापोटी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८३० विषय क्रमांक – २८
दिनांक – ५/२/२०१३ विभाग – स्थापत्य, अ प्रभाग
सुचक – मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक – मा.जावेद शेख

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/अप्र/का.अ./२५३/२०१३ दि.२८/१/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मे.वैशाली क्रिएशन्स यांची मनपाच्या मान्यताप्राप्त आर्कीटेक्ट पॅनेलवर नेमणूक झालेली असून कामाची निकड व तातडी लक्षात घेता मौजे चिखली येथिल गट क्र.१६४४ पैकी या मिळकतीतील आरक्षण क्र.१/९९ व मौजे चिखली येथील गट क्र.८४९ मधील आरक्षण क्र.१/११३

याजागेवर शाळा इमारत बांधणेसाठी आर्कीटेक्चरल सर्व्हीसेसचे काम करणेसाठी मे.वैशाली क्रिएशन्स यांची नेमणूक करणेस व या कामापोटी मनपा कडील मंजुर दराप्रमाणे देयके अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८३१ विषय क्रमांक – २९
दिनांक – ५/२/२०१३ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सुचक – मा.नवनाथ जगताप अनुमोदक – मा.राहुल भोसले
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. सशअ/५०/२०१३ दिनांक ३१/०१/२०१३.
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड सायन्स सेंटर प्रकल्पाचे उदघाटन दि.८/२/२०१३ रोजी संपन्न होत असून सदर उदघाटन सोहळ्यास सन्माननीय सांस्कृतिक मंत्री, भारत सरकार व एन.सी.एस.एम. कोलकत्ता येथील वरीष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. उपस्थितांची चहापान, अल्पोपाहार, भोजनाची व निवासाची व्यवस्था तसेच सदर उदघाटनाचे अनुषंगिक व ऐनवेळेस येणा-या प्रत्यक्ष खर्चाचा विचार करता उदघाटन सोहळ्यासाठी र.रू. ३,००,०००/- (र.रू.तीन लाख) पर्यंत खर्च अपेक्षित असल्याने सदरचा खर्च निविदा न मागविता, करारनामा न करता विद्युत मुख्य कार्यालयाकडील प्रादेशिक विज्ञान केंद्र (विज्ञान शहर तारांगण) या लेखाशिर्षातून करणेस मान्यता येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक – २८३२ विषय क्रमांक- ३०
दिनांक – ०५/०२/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक –मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/४/कावि/१३५/२०१३, दि.४/२/१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपास आवश्यक रेकॉर्ड बांधण्याचे कापडी रुमाल विविध रंगात ३६”x3६” साईजमध्ये नाडीसह मनपा बोधचिन्ह छपाईसह एकूण १०८०० नग मा.स्थायी समितीचे मान्यतेने येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे यांचेकडून थेट खरेदी केले आहे. येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे ही शासकीय संस्था असून त्यांचे दर पूर्व निर्धारीत असतात. या दरामध्ये वेळोवेळी बील होत असतात. याचा विचार करता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) अनुसुचि ड प्रकरण ५, क्रमांक (२) (२) नुसार निविदा न मागविता,करारनामा न करता थेट पध्दतीने प्रचलित दराने अंदाजत्रकीय तरतुदीच्या अधिन राहून विविध विभागांच्या आवश्यकतेप्रमाणे रेकॉर्ड बांधण्याचे कापडी रुमाल विविध रंगात ३६”x3६” साईजमध्ये नाडीसह मनपा बोधचिन्ह छपाईसह सध्या असलेल्या प्रतीनग दर र.रु.५०/- (जकात वाहतूक खर्च वगळून) प्रमाणे २०,०००/- नग एकूण र.रु.१०,००,०००/-मध्ये खरेदी करण्यास व विभागांच्या आवश्यकते प्रमाणे एकूण र.रु.१०,००,०००/- मधून वेळोवेळी सन २०१२-१३ साठी होणारा आवश्यक तो खर्च अधिक जकात, वाहतुक खर्च इ.करासह येणा-या प्रत्यक्ष खर्चास त्याचप्रमाणे पुढील सन २०१३-१४ या वर्षात मंजूर वित्तीय तरतुदीच्या मर्यादेत आवश्यकते प्रमाणे अभिलेख रुमाल खरेदी करणेस येणा-या प्रत्यक्ष खर्चास व रक्कम आगाऊ

स्वरुपात मा.प्रशासन अधिकारी, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे यांना आवश्यकते नुसार अदा करण्यास, मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८३३ विषय क्रमांक- ३१

दिनांक – ०५/०२/२०१३

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक–मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ:- मा. चंद्रकांत वाळके, मा.अश्विनी चिंचवड यांचा प्रस्ताव...

सोबत जोडलेल्या प्रपत्र प्रमाणे लेखाशिर्षात वाढ/घट करणेस मंजूरी देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु. ३६,३०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८३४ विषय क्रमांक- ३२

दिनांक – ०५/०२/२०१३

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक –मा.राहुल भोसले

संदर्भ:- मा. चंद्रकांत वाळके, मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव...

दक्षिण कोरियातील गुनसान महापालिकेसोबत पिंपरी चिंचवड मनपा चा Sister City करार झाला आहे. त्या करारा अंतर्गत Exchange Program चा अंतर्भाव आहे. दरवर्षी K2H Fellowship Program करिता म.न.पा. कडील एक कर्मचा-यांस दक्षिण कोरीयास पाठविणे आवश्यक आहे. सदर Fellowship Program मध्ये कोरियन प्रशासन भाषा, इतिहास, संस्कृती म.न.पा. कडून पुरविण्यात येणा-या नागरी सुविधा, पायाभूत सुविधा या विषयी माहिती व प्रशिक्षणाचे आयोजन गुनसान महापालिकेकडून करण्याकत येते. सदर प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिने असून कर्मचा-यांच्या प्रशिक्षणाचा खर्च गुनसान महापालिका करणार आहे. सदर प्रशिक्षणाकरिता जाण्या येण्याचा विमान प्रवासाकरिता र.रु. ६०,०००/- (अक्षरी र.रु.साठ हजार फक्त) किंवा येणारा प्रत्यक्ष खर्च कामगार कल्याण विभागाकडील तरतूदीतून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८३५ विषय क्रमांक- ३३

दिनांक – ०५/०२/२०१३

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक –मा.राहुल भोसले

संदर्भ:- मा. चंद्रकांत वाळके, मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेचे नाना नानी पार्क भोसरी उद्यानाचे देखभाल व दुरुस्ती करण्याचे सध्याचे कामास दिनांक १/२/२०१३ ते ३१/१/२०१४ या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस तसेच वार्षिक र.रु. ४,००,०००/- येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८३६ विषय क्रमांक- ३४

दिनांक – ०५/०२/२०१३

सुचक – मा. चंद्रकांत वाळके अनुमोदक–मा.अश्विनीचिंचवडे

संदर्भ:- , मा. चंद्रकांत वाळके मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २५८४ दिनांक १५/१/२०१३ मध्ये र.रु.७,२९,६८०/- ऐवजी र.रु. ७,९२,६८०/- (अक्षरी र.रु. सात लाख ब्यान्नव हजार सहाशे ऐंशी फक्त) दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८३७ विषय क्रमांक- ३५

दिनांक – ०५/०२/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक –मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड शहरामध्ये रस्त्यावर विविध ठिकाणी टाटा एसीई या छोटया चारचाकी वाहनाद्वारे जाहिरात करणेकामी मे.शिव अडव्हरटायझिंग या संस्थेबरोबर नियमानुसार ५ वर्षे करिता करारनामा करुन काम करणेसाठी परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे. ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८३८ विषय क्रमांक- ३६

दिनांक – ०५/०२/२०१३

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक –मा.आरती चौंधे

संदर्भ:- मा.छाया साबळे, मा.आरती चौंधी यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र. ४२ चिंचवड मधील ख्रिश्चन व मुस्लिम दफनभूमी भैरवनाथ स्वयंरोजगार सह संस्था मर्यादित यांस तीन वर्ष कालावधी करिता मनपा दराने देखभाल संरक्षणाकामी देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८३९ विषय क्रमांक- ३७

दिनांक – ०५/०२/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक –मा.चंद्रकांता सोनकांबळे

संदर्भ:- मा.सुषमा तनुपुरे, मा. चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आर्किटेक्ट पॅनेलवर विविध प्रकारांच्या कामाचा अनुभव असलेले सृष्टी डिझायनर आर्किटेक्ट गिरीश चिददरवार यांची नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८४० विषय क्रमांक- ३८

दिनांक – ०५/०२/२०१३ विभाग – वाहनदुरुस्ती कार्यशाळा

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक –मा.निता पाडाळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.काशा/०४/कावि/८७/२०१३, दिनांक ४/१/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे विद्युत विभागाचे वापराकरिता ११ मी. उंचीची दोन १२ मी.उंचीची एक, १३ मी. उंचीची एक, व १५ मी. उंचीची सहा अशी एकूण दहा नग हायड्रोलिक लॅडर (प्लॅटफॉर्म) प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये नमूद केलेल्या दरानुसार मे. श्रीयश सेल्स & सर्व्हिसेस कॉर्पो.रावेत पुणे -४१२११३ यांचेकडून पाच वर्ष कालावधी करता भाडे तत्वावर घेणेकामी व मनपास या दहा वाहनांपेक्षा जादा वाहनाची गरज भासलेस यांच दराने व अटी शर्ती प्रमाणे भाडे तत्वावर वाहने घेणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास तसेच मे. श्रीयश सेल्स & सर्व्हिसेस कॉर्पो.रावेत पुणे -४१२११३ यांचे समवेत तसा करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८४१ विषय क्रमांक- ३९

दिनांक – ०५/०२/२०१३

सुचक – मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक –मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा. चंद्रकांता सोनकांबळे, विनया तापकीर यांचा प्रस्ताव...

नागरवस्ती विभागाकडील विधवा, घटस्फोटीत व निराधार महिलांना व्यवसायासाठी दिले जाणा-या ६०००/- अर्थसहाय्यासाठी कोटेशन बंधनकारक असलेची अट शिथिल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – २८४२ विषय क्रमांक- ४०

दिनांक – ०५/०२/२०१३

सुचक – मा.राहुल भोसले अनुमोदक – मा.जावेद शेख

संदर्भ:- मा.राहुल भोसले,मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समितीचा ठराव झाल्यानंतर काम करण्यास नकार दिलेल्या मे.स्फूर्ती बेरोजगार सेवा सहकारी संस्था व चिंतामणी बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांची मान्यता रदद करुन

| अ.क्र. | संस्थेचे नांव | सोडत पध्दतीने प्राप्त झालेली स्मशानभूमी |
|---|---|---|
| १ | भारतीय महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित | पुनावळे स्मशानभूमी |
| २ | गायत्री एंटरप्रायजेस | बोपखेल स्मशानभूमी |
| ३ | श्रमविकास महिला स्वयंरोजगार सेवा सहाकारी संस्था मर्यादित | किवळे स्मशानभूमी |
| ४ | जनसेवा स्वयंरोजगार सेवा सहाकारी संस्था मर्यादित | फुगेवाडी दफनभूमी |

उक्त चार संस्थाना स्मशानभूमीसाठी प्रत्येकी चार काळजीवाहक नेमणेसाठी मा.स्थायी समितीचे मान्य ठरावातील अटी व शर्तीनुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( जगदिश शेट्‌टी )
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक- नस/४/कावि/१४०/२०१३
दिनांक - ०७/०२/२०१३.

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रपत्र 'अ' (क्र.-कर/मुख्य/६/कावि/९०३/२०१२ दि.१४.१२.२०१२ चे लगत)

[सन २०१३-२०१४ या सरकारी वर्षाकरिता कराचे व करेत्तर बाबींचे दर निश्चितीबाबत]

| † | करांचे दर | | | |
|---|---|---|---|---|
| † क्र | कराचे नाव | करआकारणी पध्दत | सन 2012-2013 “Öß प्रचलित दर [सध्याचे ] | सन 2013 - 2014 करिता प्रस्तावित दर |
| 1 | **सामान्य कर** | करयोग्यमूल्यावर<br>1 ŸÖê 12000/-<br>12001 ŸÖê 30000/-<br>30001 “Öß ¯Öãœê | <br>13 %<br>16 %<br>23 % | <br>15 %<br>19 %<br>27 % |
| 1 2Ö | **सामान्य कर -**<br>´ÖÖ×ÆüŸÖß ŸÖÓ¡Ö–ाान / माहिती ŸÖÓ¡Ö–ाान सहाय्यभूत सेवा धोरण 2009 चे अनुषंगाने ´ÖÖ×ÆüŸÖß ŸÖÓ¡Ö–ाानउद्योगातील मिळकतींकरिता | करयोग्यमूल्यावर<br>1 ŸÖê 12000/-<br>12001 ŸÖê 30000/-<br>30001 “Öß ¯Öãœê | 12 % | सन २०१3-२०१४ या चालू वर्षापासून धोरण 2Ö¤ü |

| † | करांचे दर | | | | |
|---|---|---|---|---|---|
| † क्र | कराचे नाव | करआकारणी पध्दत | सन 2012-2013 “Öß प्रचलित दर [सध्याचे ] | सन 2013 - 2014 करिता प्रस्तावित दर | |
| | | | | निवासी | निवासोत्तर |
| 1कú | साफसफाई कर | करयोग्यमूल्यावर | 5% | 6% | 8% |
| | अग्निशामक कर | करयोग्यमूल्यावर | 2% | 2% | 2% |
| | मनपा शिक्षण ˆ¯Ö कर | करयोग्यमूल्यावर | 4% | 4% | 5% |
| 2 | ´Ö»Ö¯Ö¾ÖÖÆü ÃÖ×¾Ö¬ÖÖ »ÖÖ3ा कर | करयोग्यमूल्यावर | 4% | 4% | 5% |
| 3 | पाणीपुरवठा ला3 कर | करयोग्यमुल्यावर | 4% | 4% | 5% |
| 4 | रस्ताकर | करयोग्यमूल्यावर | 2% | 3% | 5% |
| 5 | विशेष साफसफाई कर (±úŒŸÖ ´ÖÖ»ÃÖ, लॉजिंग 2ोर्डिंग, मंगल कार्यालय, ÃÖ3ागृह, 1ग्णालय, ÆÖ™»ÃÖ, कॅन्टीन्स, ¸ÃÖ™Ö¸™ या स्व1पाच्या मिळकतींस) | करयोग्यमूल्यावर | 2% | --- | 2% |
| 6 | वृक्ष उपकर | करयोग्यमूल्यावर | 1 % | 1 % | 1 % |

| †<br>क्र | कराचे नाव | करआकारणी पध्दत | सन 2012-2013 “Öê<br>प्रचलित (सध्याचे ) दर | सन 2013 - 2014<br>करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| 7 | नाट्यगृहा वरील कर (करमणूक कर) | 1. सिनेमा<br>†) 500 पर्यत किंवा त्यापेक्षा •ÖÖÃÖ ²ैठक व्यवस्था [xÃÖ™ÃÖ] असणा-या ×£Ö<™¸üÖ»ÖÖ<br>²Ö) ´ÖÖ¸üÖŠÖß सिनेमा<br>क) वातानुकुलित थिएटर | ¯ÖÏןÖ ×¤¾ÖÃÖ ¹ý.250/-<br><br>करमाफी<br>¯ÖÏןÖ ×¤¾ÖÃÖ ¹ý.350/- | प्रतिदिन रु.४००/-<br><br>करमाफी<br>प्रतिदिन रु.५००/- |
| | | 2. नाटक | प्रती प्रयोगास ¹ý.100/- | प्रती प्रयोगास ¹ý.200/- |
| | | 3. सर्कस [कॉन्व्हिल पेट्स] | प्रती प्रयोगास ¹ý.100/- | प्रती प्रयोगास ¹ý.100/- |
| | | 4. ŸÖ´ÖÖ¿ÖÖ | प्रती प्रयोगास ¹ý.100/- | प्रती प्रयोगास ¹ý.100/- |
| | | 5. संगीत जलसे / शास्त्रीय संगीत जलसे [×£Ö<™¸ü ´Ö¬Öß»Ö किंवा थिएटर व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास] | प्रती प्रयोगास ¹ý.100/- | प्रती प्रयोगास ¹ý.100/- |
| | | 6. कुस्त्या / मुष्टीयुध्द | प्रती खेळास ¹ý.50/- | प्रती खेळास ¹ý.50/- |
| | | 7. वरील खेळाखेरीज इतर प्रत्येक प्रयोगास [•Ö¸ü वेगवेगळे खेळ नसतील तर अशा प्रत्येक दिवसास] | ¯ÖÏןÖ ×¤¾ÖÃÖ ¹ý.100/- | ¯ÖÏןÖ ×¤¾ÖÃÖ ¹ý.100/- |

| ²Ö | **सामान्यकरातील सवलत योजना :** सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर + अग्निशामक + मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत) | | |
|---|---|---|---|
| | योजना | सन 2012-2013 चे प्रचलित धोरण [सध्याचे ] | Ãन 2013 - 2014<br>करिता प्रस्तावित धोरण |
| 1 | माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिक यांचे राहत्या १,५०० चौरस फूट पर्यंतचे निवासी घरास सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट |
| 2 | महिलांचे नावे असलेल्या ¸üहत्या 1,500 “ÖÖ¸üÃÖ ±üú™ निवासी घरांÃÖ सामान्य करात सुट | “ÖÖ»Öû Ãरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 10% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 10% रक्कम सूट |

| ²Ö | **सामान्यकरातील सवलत योजना :** सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर + अग्निशामक + मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत) | | |
|---|---|---|---|
| | योजना | सन २०१२-2013 चे प्रचलित धोरण [सध्याचे ] | सन २०१३ - 2014 करिता प्रस्तावित धोरण |
| 3 | संपूर्ण मिळकतकराची रक्कम आगाऊ ³रणा-यां करीता सामान्य करात सुट देणे | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>1) स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस - **10**% रक्कम सूट<br>2) ×²गरनिवासी / ×´ÖÁÖ / औद्योगिक /मोकळया जमिनी इ. मिळकतीस - **05**% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>1) स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीÃÖ - 10% रक्कम सूट<br>2) ×²गरनिवासी/ ×´ÖÁÖ / औद्योगिक /मोकळया जमिनीइ. मिळकतीस - **05**% रक्कम सूट |
| 4 | **ग्रीन ²ि⁄ल्डींग रेटींग सिस्टिम मिळकती :** ²ांधकाम परवानगी वि³ागा मार्फत देणेत येणा-या अंतिम ³ोगवटा पत्रÖÖ“Ö ¾ÖôÖÃÖ †×ŸÖ´Ö ग्रीन ²ि⁄ल्डींग Certificate देणेत येणा-या मिळकतीस सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>**3 Star Rating - 05% रक्कम ÃÖ™**<br>**4 Star Rating - 08% रक्कम ÃÖ™**<br>**5 Star Rating - 10% रक्कम ÃÖ™** | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>**3 Star Rating - 05% रक्कम सूट**<br>**4 Star Rating - 08% रक्कम सूट**<br>**5 Star Rating - 10% रक्कम सूट** |

| | योजना | सन 2012-2013 “Ö ¯ÖÏ“Ö×»ÖŸÖ धोरण [सध्याचे ] | सन 2013 - 2014 करिता प्रस्तावित धोरण |
|---|---|---|---|
| | सामान्यकरातील सवलतीचा ला³Ö घेणेकामी दोन्ही सहामाहीची संपूर्ण ×²लाची रक्कम आगाऊ ³रणेची मुदत (बिल मिळो अथवा न ×´ÖôÖ) | दिनांक 30 जून अखेर परंतु चालू ¾ÖÂÖÖá †´Ö»Ö ²जावणी कालावधी संपल्याने दिनांक 31 ऑगस्ट अखेर | दिनांक 30 जून अखेर |

| क | **करेत्तर ²ÖÖ²Öà“Ö ±úß / शुल्काचे दर** | | |
|---|---|---|---|
| †. क्र. | नाव | सन 2012-2013 “Ö प्रचलित (सध्याचे) ¤ü¸ü | मागील वर्षीचे अहवालानुसार सन 2013-2014 करिता ¯ÖÏÃŸÖÖ×¾ÖŸÖ ¤ü¸ü |
| 1 | थक²ाकी नसलेचा दाखला फी | प्रती दाखला ¹पये 5/- | प्रती दाखला ¹पये 100/- |
| 2 | मिळकत उतार फी | प्रती उतारा रुपये १०/- | प्रती उतारा रुपये 25/- |
| 3 | हस्तांतरण नोटीस फी | 1 % [करयोग्य मुल्यावर] | 5% [करयोग्य मुल्यावर] |
| 4 | प्रशासकीय सेवा शुल्क | प्रती बिल रुपये ५/- | प्रती बिल रुपये १००/- |

**ÃÖÆüß/-**

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

¯ÖÖ¸üß - 411 018.